प्रसिद्धीपत्रक

# लवासामध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बळ घटकांतील मुलांना प्रसिद्ध क्रीडा प्रशिक्षक डीन गिलख्रिस्ट यांच्याकडून प्रशिक्षण

**४ मार्च २०१४, लवासा :** क्रिकेट आणि फुटबॉल या खेळांचे उच्च दर्जाचे व्यावसायिक प्रशिक्षण देणारे नामवंत क्रीडा प्रशिक्षक डीन गीलख्रिस्ट यांनी तरुण हौशी खेळाडूंचे कौशल्य वाढविण्यासाठी नुकतीच येथे प्रशिक्षण कार्यक्रमांची मालिका हाती घेतली होती. अशा प्रकारचा हा पहिलाच प्रशिक्षण कार्यक्रम निसर्गरम्य लवासा शहरातील डॅसनिओ टाऊन ॲण्ड कंट्री क्लब येथे पार पडला.

डीन यांनी या खेळांच्या व्यावहारिक गोष्टींवर लक्ष केंद्रित करणारे प्रशिक्षण देऊन तरुण मुलांना काही छोट्या छोट्या तांत्रिक बाबीही सांगितल्या. स्थानिक गावांमधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठीच्या ख्रिस्टेल हाऊस, लवासा या शाळेतील सुमारे १०० विद्यार्थ्यांनी या प्रशिक्षणात भाग घेऊन नवीन कौशल्ये आत्मसात करण्यात रस घेतला.

स्पोर्ट्सप्रो या ऑस्ट्रेलियातील आघाडीच्या क्रीडा प्रशिक्षण कंपनीच्या भागीदारीतून भारतात स्थापन झालेल्या 'स्पोर्ट्स फॉर लाइफ' या नावीन्यपूर्ण क्रीडा प्रशिक्षण पुरवठादार संस्थेच्या साथीने लवासाने हे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले आहेत. ऑस्ट्रेलियाचे माजी क्रिकेटपटू ॲडम गिलख्रिस्ट यांचे भाऊ असलेल्या व स्पोर्ट्सप्रो ऑस्ट्रेलियाचे व्यवस्थापकीय संचालक डीन गिलख्रिस्ट हे 'स्पोर्ट्स फॉर लाइफ'चे प्रशिक्षण व तांत्रिक संचालक आहेत.

लवासा येथे झालेल्या कार्यक्रमाविषयी डीन गिलख्रिस्ट म्हणाले की ख्रिस्टेल हाऊस, लवासा येथील विद्यार्थ्यांकडून अनेक क्रीडा उपक्रम करून घेणे हा अतिशय प्रतिष्ठेचा आणि थरारक अनुभव होता. ही मुले खरोखरच अतिशय गुणवान आहेत, त्यांनी आमच्या सेशनमधील प्रत्येक गोष्ट त्वरित आत्मसात केली. सर्व मुलांना शिकवणे हा अंतर्बाह्य आनंदाचा अनुभव होता आणि ती मुलेही आयुष्यातील रोमहर्षक काळ अनुभवत होती, हे स्पष्ट दिसत होते. आम्ही लवासाच्या मुलांना खेळाचा आनंद आणि फायदे यांचे शिक्षण देण्यासाठी येथे पुन्हा येऊ अशी आशा आहे.

याप्रसंगी लवासा कॉर्पोरेशन लिमिटेडचे अध्यक्ष नाथन अँड्र्यूज म्हणाले, ''लवासा हे क्रीडाक्षेत्रातील एक प्रमुख केंद्र म्हणून विकसित करण्याचा आमचा प्रयत्न आहे. गोल्फच्या क्षेत्रातील दिग्गज सर निक फाल्डो यांच्यासोबत आम्ही येथे गोल्फ ॲकॅडमी सुरू करण्याच्या दृष्टीने हातमिळवणी केली आहे, त्याचप्रमाणे हॉकी ऑस्ट्रेलियाबरोबर हॉकी ॲकॅडमीसाठी, सर स्टीव्ह रेडग्रेव्ह यांच्याबरोबर रोईंग ॲकॅडमी आणि अन्य भागीदारांबरोबर बॅडमिंटन, स्क्वॉश आणि फुटबॉल ॲकॅडमींच्यासाठी करार करण्यात आले आहेत.

'स्पोर्ट्स फॉर लाइफ'बरोबर आयोजित करण्यात आलेला प्रशिक्षण कार्यक्रम हा लवासाच्या प्रसारासाठी आणि स्थानिक समाजातील गुणवान मुलांचे भवितव्य घडविण्यासाठी हाती घेण्यात आलेल्या अनेक उपक्रमांपैकी एक आहे.

## About Dean Gilchrist

Dean Gilchrist is the Managing Director of Sportspro, Australia's leading sports education provider and elder brother of Adam Gilchrist, ex-vice captain of the Australian cricket team. Dean is a highly qualified and experienced personal development, health and physical education teacher and professional high performance cricket and soccer coach. Dean established Sportspro in 1995 and since then the company has gone on to become the leading sports education provider in Australia. Sportspro provides curriculum based sports education programs to schools and has also incorporated coaching programs and services to sports clubs and individuals to accommodate this ever growing demand. Dean lives in Sydney with his wife Kathy and their two daughters.

## About Sports for Life

Sports for Life is an innovative sports education provider incorporated in India in partnership with Sportspro, Australia's leading sports education company. Sports for Life provides curriculum based, age / ability progressive sports education programs to schools, clubs and corporate entities that allows participants to nurture and develop sports, athletic and gymnastic skills that will greatly enhance their lives. Our programs are developed based on Sportspro's internationally recognized and accredited curriculums. All programs are delivered by highly qualified and trained teachers and trainers.

Sports for Life – Gautam Gadgil – 98300 43381 – Email- gautam@sportingedgecc.com

## About Lavasa

Lavasa is India's first planned hill city where people can live, work, learn and play in harmony with nature. Lavasa, is an inclusive city being developed by Lavasa Corporation Limited. Spread over 10,000 hectares, is based on the principles of New Urbanism. It takes three hours from Mumbai and one hour from Pune to reach Lavasa by road. Lavasa will host a multitude of global leaders in hospitality, tourism, education, health care, business research and industry. The hill city provides a combination of contemporary and timeless architectural designs, with multiple options for housing including rental housing, apartments and villas. With state-of-the-art infrastructure and amenities, the city enables people to live life in full.

For Media Enquiries:


| Lavasa Corporation Limited | Adfactors PR |
|---|---|
| Ashwin Shetty - 99670 24293<br>ashwin.shetty@lavasa.com | Parikshit Joshi – 98339 17030<br>parikshit.joshi@adfactorspr.com |
| Ankul Bhavsar – 9820168842<br>ankul.bhavsar@lavasa.com | Ninad Siddhaye – 9619500760<br>ninad.siddhaye@adfactorspr.com |